जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police


# दैनंदिन गुन्हयाची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०२/०५/२०२१

## दि.०१/०५/२०२१ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १०४/२०२१,भादविक ३०२,३२३ |
| **फिर्यादी** | मौलाली मंजलापुरे,वय-३१ वर्षे,रा.४२७,इंदिरानगर वसाहत,गुलटेकडी,मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपी** | असिफ दस्तगीर आत्तार,वय-२६ वर्षे,रा.सनं.६५७,शेळके चाळ,रुम नं.१७,शेळके वस्ती, बिबवेवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०५/२०२१ रोजी सकाळी ०९/०० वा.सनं.६५७,शेळके चाळ,रुम नं.१७,शेळके वस्ती, बिबवेवाडी,पुणे येथे आरोपीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद अटक आरोपी असिफ आत्तार याने त्याची सासु सौ.अनारकली महमद तेरणे, वय-४५ वर्षे,रा.सध्या सनं.६५७,शेळके चाळ,रुम नं.१७,शेळके वस्ती,बिबवेवाडी,पुणे मुळगाव-ता.हुक्केरी,जि. बेळगाव,राज्य कर्नाटक हिस नमुद ठिकाणी रोजचे घरगुती भांडणास कंटाळुन रागाचे भरात हाताने मारहाण करुन,ओढणीने तीचा गळा आवळून,जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राजेश उसगांवकर ७३५०५४७००७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ८५/२०२१,भादविक ३९२,४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३९ वर्षे,रा.बोपोडी,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी महिला ३० ते ३५ वर्षे व एक अनोळखी पुरुष २५ ते ३० वर्षे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०३/२०२१ रोजी दुपारी ०२/०० वा. विश्रांतवाडी चौक,विश्रांतवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा टुरीस्टचा व्यवसाय असुन,यातील नमुद दोन अनोळखी महिला व एक पुरुष यांनी संगनमत करून,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,त्यांना १,६७०/- यु.एस.डॉलर ४ लाख रुपयाचे बदल्यात देतो असे आमिष दाखवुन,फिर्यादी यांना १,६७०/- रूपये यु.एस.डॉलर ऐवजी वर्तमानपत्राचे नोटांचे आकाराचे बंडल असलेली बॅग देवुन,फिर्यादी यांची फसवणुक करुन त्यांचेशी झटापट करुन,फिर्यादी यांचा मित्र यास खाली पाडुन त्यांचे हातातुन ४ लाख रुपये रकमेची बॅग बळजबरीने हिसकावुन चोरुन घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एल.आर.सातपुते ९४२३८१९०८० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३५६/२०२१,भादविक ३०७,५०४,३४,१४३,१४७,१४८,१४९,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | फरहान पिरजादे,वय-१९,रा.कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | पाच इसम व त्याचे इतर साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०४/२०२१ रोजी १९/३० ते २०/०० वा.चे दरम्यान सनश्री सोसायटीच्या समोरील जयश्री सुपर शॉपी समोर सार्वजनिक रस्त्याला लागुन कोंढवा,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह एकत्र येवुन फुटबॉल खेळणेसाठी जात असताना,काही दिवसांपुर्वी फिर्यादी यांचे मित्रांची नमुद आरोपी बरोबर किरकोळ कारणावरुन भांडणे झाली होती. सदरची भांडणे फिर्यादी यांनी सोडवल्याचा राग मनात धरुन,सदर आरोपी यांनी कोयता व पालघन सारखे धारदार शस्त्राने जीवे मारण्याचे उद्देशाने फिर्यादी यांचे चेह-याचा डाव्या बाजुला,हाताच्या दंडावर,मनगट व खांद्याचे मागे वार करुन त्यांना गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादी यांचे दोन्ही मित्र भांडणा मध्ये पडल्याने त्यांनादेखील धारदार शस्त्राने व बेस बॉल स्टीकने मारहाण करुन जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. स्वप्निल पाटील ९९७५६३३७०३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ११०/२०२१,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | मिथीलेश उपाध्याय,वय-२७,रा.खराडी रोड,यशवंतनगर,पुणे |
| **आरोपी** | १.रोशन सुरेश पराते,वय-२६,रा.पवार वस्ती,केशवनगर,पुणे २.शिवराज अर्जुन वाडेकर,वय-२२,रा. सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०४/२०२१ रोजी १८/०० वा.युवॉन आयटी पार्क जवळील गेरा सोसायटी समोरील रोडवर,खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सदर ठिकाणाहुन जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून पत्ता विचारण्याचे बहाण्याने त्यांचे पाठीमागुन जवळ येवुन,फिर्यादी यांचे शर्टचे खिशातील ३ हजार रू किमतीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. भालचंद्र ढवळे ९९६७५२७६६० |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३५७/२०२१,भादविक ३२६(अ),५०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३७ रा.पिसोळी,पुणे |
| **आरोपी** | दिनेश शिरपत धुमक,वय-३९,रा.बावधन गाव,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०५/२०२१ रोजी ०८/३० वा.बोपदेव घाट येथील रस्त्यावर गाडी थांबवुन |
| **तपशिल** | यातील आरोपी याने फिर्यादीस त्याचे मोटार सायकलवर बसवुन,नमुद ठिकाणी घेवुन जावुन,तेथे रस्त्यावर गाडी थांबवुन,फिर्यादी यांचेवर संशय घेवुन,फिर्यादी यांना तुझे कामाचे ठिकाण दाखव असे म्हणाला असता,फिर्यादी यांनी त्यास नकार दिला असता,तु काम कशी करतेच तेच बघतो, तुझ्या तोंडावरील मास्क खाली कर मला तुझा चेहरा पाहायचा आहे. त्यामुळे फिर्यादी यांनी तीच्या तोंडावरील मास्क खाली घेतला असता,आरोपी याने त्याचेजवळ असलेल्या बाटली मधील ॲसीड सारखे असणारे ज्वलनशील पदार्थ फिर्यादी यांचे तोंडावर व अंगावर टाकण्याचा प्रयत्न करुन, फिर्यादीस डाव्या डोळ्याच्या वरती व डाव्या दंडावर भाजुन जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. चैत्राली गपाट ७०८३४८०११० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

.